# वार्तापत्र

दिनांक ०९.०९.२०१९

| पो.स्टेशन/अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| कुरखेडा अप. क्र. ९५/२०१९ कलम ३९२,३४२,५०४,५०६,३४ भादवि | मौजा खैरीटोला फाटा पो.स्टे आष्टी **घटना ता. वेळ :-** दिनांक ०४.०९.२०१९ चे २०.५० वा. | फिर्यादी :- दिपेश विष्णु तक्तानी रा. कुरखेडा जिल्हा गडचिरोली **अटक आरोपीतांचे नाव :-** १. **अक्षय ईश्वर बोदेले वय २३ वर्षे** २. **गोलु उर्फ चेतन लालाजी मांडवे वय २४ वर्षे** ३. **सौरभ युदिष्टीर राऊत वय २३ वर्षे सर्व रा. गोठनगाव** |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **गुन्हा उघडकिस आणण्यामधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी, सहा. पोलीस निरीक्षक विक्रात सगणे, मपोउपनि पुनम जगताप, सफौ/गंगाधर भोयर, सफौ/ दादाजी करकाडे पोहवा/नरेश सहारे, पोहवा/ भाऊराव बोरकर, चापोना/रमेश ताकसांडे स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली | |

सदर गुन्हयातील फिर्यादी याचे मौजा केशोरी येथे अनुज्ञाप्ती असलेले देशी विदेशी दारु विक्रिचे दुकाण असुन, दुकाणातील दारु विक्रीपोटि आलेली रक्कम घेवुन फिर्यादी हा त्याचे वडीलासह दिनांक ०४.०९.२०१९ रोजी सायंकाळी २०.३० वाजता चे सुमारास मौजा केशोरी येथुन त्याचे मालकिचे चारचाकी वाहनाने कुरखेडा येथे येत असतांना प्रवासा दरम्यान मौजा खैरीटोला फाटयावर पोहचले त्या दरम्यान यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन जबरी चोरी करण्याचे उद्देशाने त्यांनी त्यांचे ताब्यातील चारचाकी वाहन फिर्यादिचे वाहनासमोर आडवी करुन त्यास रोड दरम्यान थांबवुन फिर्यादिचे ताब्यात असलेली एकुन ४,०००००/- रुपये रक्कम जबरीने चोरी करुन फिर्यादिस तसेच त्याचे वडीलास शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादिचे फिर्याद वरुन दिनांक ०५.०९.२०१९ रोजी पोलीस स्टेशन कुरखेडा येथे नमुद प्रमाणे गुन्हा नोंद करुन पो.स्टे कुरखेडा येथे तपासावर आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता गुन्हा उघडकिस आणण्याचे दृष्टीने मा. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक,गडचिरोली मा. डॉ. मोहितकुमार गर्ग,अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पोलीस पथकाने गुन्हयातील पाहिजे आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेणेकामी आपले स्तरावर गोपनिय बातमीदार सक्रिय करुन बातमीदारांचे माहितीवरुन गुन्हा उघडकिस आणण्याचे दृष्टीने कशोशिने प्रयत्न करुन आरोपीतांच्या गोपनिय हालचालीची माहिती घेवुन दिनांक अ०७.०९.२०१९ रोजी मौजा आरमोरी बर्डी येथे आरोपी हे त्याचे अस्तीत्व लपवुन फिरत असल्याची माहिती मिळताच त्यांना ताब्यात घेवुन गुन्हयाचे पुढील तपासकामी पोलीस स्टेशन कुरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले.